सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २७ मे २०२६

आतील पानावर

पान २– 'कर्तव्य' चित्रपटात सैफ अली खान
पान ३– 'भारत भाग्य विधाता' मध्ये कंगनाची धाडसी भूमिका
पान ४– अनिल कपूर साऊथ इंडस्ट्रीत दिसणार!
पान ५– नॅशनल क्रश गिरिजाने लूक बदलला!
पान ७– वीर पहारिया बेनाम सिनेमात

# बिग बजेट पिक्चरमध्ये 'अशी' झाली जान्हवीची एन्ट्री



बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर हिंदीसोबतच दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतही आपली छाप पाडताना दिसत आहे. 'देवरा पार्ट १' नंतर आता ती राम चरणसोबत आगामी 'पेड्डी' चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकणार आहे. या चित्रपटात ती 'अचियम्मा' ही महत्त्वाची भूमिका साकारत आहे. मात्र, या भूमिकेसाठी सुरुवातीला जान्हवी नव्हे तर तिची धाकटी बहीण खुशी कपूरची निवड करण्यात आली होती, असा खुलासा दिग्दर्शक बुची बाबू सना यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत केला आहे. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान दिलेल्या एका मुलाखतीत दिग्दर्शक बुची बाबू सना यांनी सांगितले की, त्यांनी सुरुवातीला खुशीला 'अचियम्मा'च्या भूमिकेसाठी कथा ऐकवली होती. मात्र, प्रत्यक्ष भेटीनंतर त्यांना खुशी या भूमिकेसाठी खूपच लहान वाटली. याबाबत बोलताना बुची म्हणाले, मी आधी खुशी कपूरला कथा ऐकवली होती. पण तिला भेटल्यानंतर मला जाणवलं की ती या भूमिकेसाठी योग्य नाही. त्यानंतर मला त्याच घरात जाऊन जान्हवीला कथा सांगावी लागली. तो क्षण माझ्यासाठी खूप अवघड होता. ते पुढे म्हणाले, मी जान्हवीला स्पष्ट सांगितलं की खुशीला का नकार दिला. मी खुशीला भेटून 'हाय' म्हटलं आणि सांगितलं की मला या भूमिकेसाठी तिच्याऐवजी जान्हवी हवी आहे. सिनेमात कधी कधी अशा कठीण निर्णयांची गरज असते. असेही त्यांनी बोलताना नमूद केलं. दिग्दर्शकाने हेही स्पष्ट केले की, सुरुवातीपासूनच त्यांच्या मनात या भूमिकेसाठी जान्हवीच फिट बसत होती. मी इतर कलाकारांना कथा सांगत असतानाही माझ्या डोळ्यासमोर 'अचियम्मा'च्या भूमिकेत जान्हवीच होती. राम चरण आणि जान्हवी कपूर अभिनीत 'पेड्डी' हा चित्रपट ४ जून रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर आणि गाणी समोर आली असून, प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.



# 'सिस्टीम'मध्ये सोनाक्षी सिन्हा

सोनाक्षी सिन्हा एका ओटीटी चित्रपटात दिसून येत आहे. या चित्रपटाचे नाव सिस्टीम आहे. हा चित्रपट अमेझॉन प्राइम व्हिडिओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर पाहता येणार आहे. या चित्रपटामध्ये सोनाक्षीसोबत दाक्षिणात्य अभिनेत्री ज्योतिका तसेच आशुतोष गोवारिकर दिसून येत आहेत. तसेच चित्रपटात सोनाक्षी एका वकिलाची भूमिका साकारत आहे. सिस्टीम हा चित्रपट २२ मे रोजी प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात याचबरोबर प्रीति अग्रवाल, आदिनाथ कोठारे, आश्रिया मिश्रा, गौरव पांडे आणि सायंदीप गुप्ता हे देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसत आहेत. तर या चित्रपटाचे दिग्दर्शन अश्विनी अय्यर तिवारी यांनी केले आहे. पम्मी बावेजा, हरमन बावेजा आणि स्मिता बालिगा यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर याची कहाणी हरमन बावेजा, अरुण सुकुमार, अश्विनी अय्यर तिवारी, तस्नीम लोखंडवाला आणि अक्षत घिल्डियाल यांनी लिहिली आहे. या चित्रपटाला सध्या प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपट काय कमाल करेल ते पहावे लागणार आहे.



# 'कर्तव्य' चित्रपटात सैफ अली खान

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान पुन्हा एकदा ओटीटीवर गणवेशात दिसून येणार आहे. सेक्रेड गेम्समध्ये सरताज सिंहची भूमिका साकारून प्रेक्षकांची मने जिंकलेला सैफ आता 'कर्तव्य' या क्राइम ड्रामापटात पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसून येईल. या चित्रपटाची निर्मिती शाहरुख खान आणि गौरी यांचे प्रॉडक्शन हाऊस रेड चिलीज एंटरटेनमेंटच्या बॅनर अंतर्गत निर्माण करण्यात आला आहे. कर्तव्य हा चित्रपट १५ मे रोजी प्रदर्शित झाला आहे. कर्तव्य या चित्रपटात देशाच्या दुर्गम भागात सेवा बजावणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची कहाणी मांडली जाणार आहे. सैफ यात पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत असून तो एका मोठ्या नैतिक द्वंदात अडकला आहे. कामाच्या मोर्चावर वाढत्या धोक्यामुळे त्याचा परिवारही संकटात सापडला आहे. खासगी आयुष्य पणाला लागले असतानाही हा अधिकारी स्वतःचे कर्तव्य पार पाडण्यासाठी कुठल्याही थराची जाण्याची तयारी करतो. या चित्रपटात सैफसोबत रसिका दुग्गल, संजय मिश्रा, जाकिर हुसैन, मनीष चौधरी यांच्यासोबत सौरभ द्विवेदीही दिसून येणार आहे. सैफचा चालू वर्षात 'हैवान' हा चित्रपटही प्रदर्शित होणार असून याचे दिग्दर्शन प्रियदर्शन करत आहेत. हा चित्रपट २०१६ प्रदर्शित मल्याळी थ्रिलर 'ओप्पम'चा रिमेक आहे.



# 'दृश्यम ३'मध्ये तब्बू दिसणार का?



गेल्या काही महिन्यांपासून मनोरंजन विश्वात एका सिनेमाची चर्चा आहे. हा सिनेमा म्हणजे 'दृश्यम ३'. अजय देवगण पुन्हा एकदा विजय साळगावकरच्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याने सर्वांना उत्सुकता आहे. पण, अनेक चाहत्यांच्या मनात एकच प्रश्न रेंगाळत आहे की, 'दृश्यम ३' मध्ये तब्बू पुन्हा एकदा आयपीएस अधिकारी 'मीरा देशमुख'च्या भूमिकेत परतणार का? आता यावर स्वतः चित्रपटाचे दिग्दर्शक अभिषेक पाठक यांनी मौन सोडले असून, एक महत्त्वपूर्ण संकेत दिला आहे.

एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना दिग्दर्शक अभिषेक पाठक यांनी तब्बूच्या भूमिकेबाबतची चाहत्यांची उत्सुकता कमालीची वाढवली आहे. 'दृश्यम २' च्या शेवटी मीराच्या मुलाच्या म्हणजेच 'सॅम'च्या अस्थींचे विसर्जन झाल्यानंतर मीरा देशमुखची कथा संपली आहे, असा अंदाज अनेकांनी लावला होता. यावर अभिषेक पाठक यांनी भाष्य केलंय. अभिषेक पाठक म्हणाले, प्रत्येकाला नेमके हेच वाटते की मीराची कथा तिथेच संपली. पण ज्या क्षणी तुम्हाला वाटते की 'दृश्यम' संपत आले आहे, नेमक्या त्याच क्षणी तुम्ही प्रत्यक्षात या कथेचा पुरेसा खोलवर विचार केलेला नसतो. या कथेत सांगण्यासारखे अजूनही खूप काही बाकी आहे. अभिषेक पाठक यांच्या या विधानामुळे 'दृश्यम ३' मध्ये तब्बूची एन्ट्री होणार आणि ती पुन्हा एकदा विजय साळगावकरच्या अडचणी वाढवणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. 'दृश्यम ३' हा या थरारक फ्रँचायझीचा तिसरा आणि अंतिम अध्याय असणार आहे. हा चित्रपट २ ऑक्टोबर २०२६ रोजी गांधी जयंतीच्या मुहूर्तावर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे.

हा चित्रपट मूळ दिग्दर्शक जीतू जोसेफ यांच्या याच नावाच्या मल्याळम चित्रपटाचा अधिकृत रिमेक आहे, ज्यामध्ये साऊथचे सुपरस्टार मोहनलाल यांनी मुख्य भूमिका साकारली होती. तथापि, हिंदी प्रेक्षकांसाठी एक मोठी आनंदाची बातमी म्हणजे, हिंदी आवृत्तीच्या दिग्दर्शकाने हा भाग मल्याळम चित्रपट 'दृश्यम ३' पेक्षा लक्षणीयरीत्या वेगळ्या आणि नव्या पद्धतीने तयार केला आहे. त्यामुळे मल्याळम चित्रपट पाहिलेल्या प्रेक्षकांसाठीही हिंदी 'दृश्यम ३' मध्ये अनेक नवनवीन ट्विस्ट आणि सस्पेन्स पाहायला मिळणार आहेत.



# अक्षय खन्नाच्या 'महाकाली' मध्ये 'हा' अभिनेता झळकणार!

गाजलेल्या 'हनुमान' सिनेमाचे दिग्दर्शक प्रशांत वर्मा पुन्हा एकदा त्यांच्या नव्या चित्रपटाच्या माध्यमातून बॉक्स ऑफिसवर लोकांची मनं जिंकण्यासाठी सज्ज झाले आहेत. सध्या ते त्यांच्या आगामी 'महाकाली' या चित्रपटामुळे प्रचंड चर्चेत आहेत. अलिकडेच चित्रपटाच्या निर्मात्यांनी अक्षय खन्नाच्या व्यक्तिरेखेचा पहिला लूक रिलीज केला. चित्रपटात अक्षय खन्ना असुरगुरु शुक्राचार्य यांची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण सध्या सुरू असून, यात दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील इतरही दिग्गज कलाकार दिसणार आहेत. अशातच 'महाकाली' सिनेमाच्या कास्टिंगबद्दल एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. दरम्यान, 'महाकाली' बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित चित्रपटात आणखी एका बॉलिवूड अभिनेत्याची वर्णी लागली आहे. कोण आहे हा अभिनेता? जाणून घेऊया... हिंदी सिनेसृष्टीतील हँडसम हंक अभिनेता रोहित सराफ या चित्रपटात दिसणार आहे. 'महाकाली' या या पौराणिक चित्रपटात रोहित एक महत्त्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे. त्याच्या या भूमिकेबद्दल कोणतीही अपडेट देण्यात आलेली नाही. या चित्रपटाद्वारे तो तेलगू चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रोहितने हैदराबादमध्ये 'महाकाली'च्या चित्रीकरणाला सुरुवात केली आहे. दरम्यान, चित्रपटात अक्षय खन्ना आणि भूमि शेट्टी हे देखील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. या दोन्ही कलाकारांचे फर्स्ट लुक यापूर्वीच समोर आले असून, आता रोहित चित्रपटात कोणत्या भूमिकेत दिसणार? हे जाणून घेण्यास प्रेक्षक देखील उत्सुक झाले आहेत. 'महाकाली'ची निर्मिती आरके दुग्गल आणि रिवाज रमेश दुग्गल हे आरकेडी स्टुडिओजच्या बॅनरखाली करत आहेत. हा चित्रपट प्रशांत वर्मा यांच्या सिनेमॅटिक युनिव्हर्सचा भाग आहे, त्यामुळे सिनेरसिकांच्या लक्ष या प्रोजेक्टकडे लागून राहिलं आहे. अभिनेता रोहित सराफच्या कामाबद्दल सांगायचं झाल्यास, अलिकडेच तो 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' या चित्रपटात दिसला आहे. या चित्रपटात रोहितसह वरुण धवन, जान्हवी कपूर आणि तान्या मल्होत्रा अशी स्टारकास्ट होती. आता रोहित लवकरच नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

# कान्समध्ये डायना पेंटीचा पारंपरिक जलवा

कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये भारतीय कलाकारांचा ग्लॅमरस अंदाज सतत चर्चेत आला. आलिया भट्ट, हुमा कुरेशी आणि अदिती राव हैदरी यांच्यानंतर आता अभिनेत्री डायना पेंटी हिनेही आपल्या पारंपरिक लूकने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतले. कान्समधील तिच्या खास साडी लूकची सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे. डायना पेंटीने कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये भारत पॅव्हेलियनमध्ये आयोजित चर्चासत्रात सहभाग घेतला. या खास कार्यक्रमासाठी तिने भारतीय पारंपरिक पोशाखाची निवड केली. फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांनी डिझाइन केलेली गोल्डन रंगाची आकर्षक साडी परिधान केली होती. या साडीत डायना देखणी आणि राजेशाही अंदाजात दिसत होती. डायनाची ही साडी साधी नसून अत्यंत वेगळ्या पद्धतीने ड्रेप करण्यात आली होती. पारंपरिक साडीला मॉडर्न टच देण्यासाठी तिने त्यासोबत गोल्डन जॅकेटही परिधान केलं होतं. या हटके स्टाइलमुळे चाहत्यांनी तिच्या फॅशन सेन्सचं भरभरून कौतुक केलं. या लूकला अधिक आकर्षक बनवण्यासाठी डायनाने स्मोकी आय मेकअप केला होता. डायनाच्या या लूकवर डिझायनर मनीष मल्होत्रा यांनीही प्रतिक्रिया दिली. त्यांनी कमेंट सेक्शनमध्ये हार्ट इमोजी पोस्ट करून तिच्या लूकचं कौतुक केलं. तसेच मेकअप आर्टिस्ट शान मुत्ताथिल यांनीही डायनाच्या स्टाइलचं विशेष कौतुक केलं आहे. ती म्हणाली की, भारत पॅव्हेलियनमध्ये मनीष मल्होत्रांनी डिझाइन केलेली खास साडी परिधान केली आहे. कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये डायना पेंटीने कार्यक्रमातही सहभाग घेतला. यावेळी तिच्यासोबत दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर उपस्थित होते. डायनाने त्यांच्यासोबतचे काही फोटोही सोशल मीडियावर शेअर केले आहेत. कान्स २०२६ मध्ये भारतीय अभिनेत्रींचे पारंपरिक आणि ग्लॅमरस लूक सतत चर्चेत असताना, डायना पेंटीने आपल्या हटके साडी स्टाइलने एक वेगळी छाप पाडली आहे.



# 'भारत भाग्य विधाता' मध्ये कंगनाची धाडसी भूमिका

अभिनेत्री कंगना रनौत पुन्हा एकदा देशभक्ती आणि धैर्याची कथा मोठ्या पडद्यावर घेऊन येत आहे. तिच्या आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाची रिलीज डेट नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट कामा रुग्णालयातील डॉक्टर, नर्स आणि कर्मचाऱ्यांच्या शौर्याची कहाणी दाखवणार आहे. चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर शेअर करत मेकर्सनी सामान्य लोकांची असामान्य कहाणी अशी ओळ दिली आहे. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला होता. त्या रात्री संपूर्ण शहर भीतीच्या सावटाखाली होते. बाहेर गोळीबार सुरू असताना कामा रुग्णालयातील कर्मचारी मात्र जीवाची पर्वा न करता रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी झटत होते. या धाडसी कर्मचाऱ्यांनी जवळपास ४०० रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांचे जीव वाचवल्याचे सांगितले जाते. 'भारत भाग्य विधाता'ची कथा मुख्यतः रुग्णालयाच्या वॉर्डमध्ये घडते. दहशतीच्या वातावरणातही काही लोकांनी माणुसकी आणि कर्तव्याला प्राधान्य दिले. या चित्रपटातून त्याच हिरोंना आदरांजली वाहण्यात येणार आहे. आतापर्यंत २६/११ वर अनेक चित्रपट आले, पण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या संघर्षावर आधारित कथा फार कमी वेळा प्रेक्षकांसमोर आली आहे. या चित्रपटात कंगना एका नर्सच्या भूमिकेत दिसणार आहे. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना तिने सांगितले की, खरी हिंमत नेहमी मोठ्या घोषणांमध्ये दिसत नाही, तर शांतपणे कर्तव्य निभावणाऱ्या लोकांमध्ये असते. ही कथा त्या सामान्य लोकांची आहे, जे संकटाच्या काळात ढाल बनून उभे राहिले, असे ती म्हणाली. चित्रपटात कंगनासोबत गिरिजा ओक, स्मिता तांबे, अमृता नामदेव, ईशा डे, प्रिया बेर्डे, आशा शेलार, आदित्य मिश्रा आणि जाहिद खान यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. देशासाठी आणि माणुसकीसाठी जीव धोक्यात घालणाऱ्या खऱ्या हिरोंची कहाणी सांगणारा 'भारत भाग्य विधाता' हा चित्रपट प्रेक्षकांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरणार असल्याची चर्चा सध्या सुरू आहे.



# विजयची लेडी लक कोण?

थलपथी विजय हा एक दाक्षिणात्य लोकप्रिय अभिनेता आहे. त्याने अनेक उत्तम चित्रपटाने दिले आहेत. तर हा अभिनेता आता एका कारणामुळे चर्चेत आला आहे. तर हा अभिनेता तामिळनाडूचा मुख्यमंत्री झाला आहे. आता लोक विजय यांच्या या भव्य विजयाचे श्रेय एका विशेष व्यक्तीच्या आशीर्वादाला देत आहेत. ज्यांनीही ४ मे रोजीच आपल्या आयुष्याच्या नव्या वर्षाची सुरुवात केली होती. विजयचे बातम्या सुरु असताच अभिनेत्री त्रिशा कृष्णन सोशल मीडियावर ट्रेंड होऊ लागल्या. विजयचे ऐतिहासिक राजकीय यश आणि त्रिशाचा वाढदिवस एकाच दिवशी येणे, हा चाहत्यांसाठी एक योगायोगच आहे. या खास दिवशी, त्रिशाने देवाचा आशीर्वाद घेण्यासाठी तिरुपती मंदिराला भेट दिली. चाहत्यांनी मंदिरातील फोटो आणि तिच्या चेहऱ्यावरील तेज यांचा थेट संबंध विजयच्या विजयाशी जोडला. त्रिशाने विजयला दिलेल्या वाढदिवसाच्या भेटीबद्दल इंटरनेटवर जोरदार चर्चा सुरू आहे आणि लोक याला त्रिशाचे 'लेडी लक' म्हणत आहेत. विजय आणि त्रिशा हे चित्रपटसृष्टीतील आवडत्या जोड्यांपैकी एक आहेत. त्या दोघात उत्तम मैत्री आहे. काही दिवसापुर्वी विजय आणि त्याच्या पत्नीच्या मतभेदामुळे, त्रिशा आणि विजय या दोघांमध्ये काहीतरी अफवा पसरल्या होत्या मात्र अभिनेत्रीने यास मान्यता दिली नाही. मात्र आणि सार्वजनिक ठिकाणी ते एकत्र दिसतात त्यामुळे अशा अफवांना खतपाणी मिळते. 'पेड्डी' सिनेमातील गाण्यांनी चाहत्यांना भुरळ पडली आहे. चित्रपटातील पहिले गाणे चिकिरी चिकिरी प्रेक्षकांच्या मनात घर करून गेले. बुची बाबू साना लिखित आणि दिग्दर्शित 'पेड्डी'मध्ये राम चरण मुख्य भूमिकेत असून त्यांच्यासोबत शिवा राजकुमार, जान्हवी कपूर, दिव्येंदु शर्मा आणि जगपति बाबू देखील दिसणार आहेत. हा चित्रपट ४ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.



# अनिल कपूर साऊथ इंडस्ट्रीत दिसणार

ज्युनियर एनटीआरच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्याच्या बहुप्रतीक्षित 'ड्रॅगन' या चित्रपटाचा धमाकेदार टीझर रिलीज करण्यात आला आहे. 'केजीएफ' आणि 'सलार' फेम दिग्दर्शक प्रशांत नील या चित्रपटाचे दिग्दर्शन करत असल्याने या चित्रपटाची प्रचंड उत्सुकता होती. प्रशांत नील यांनी ४ मिनिटे २८ सेकंदांच्या या टीझरमध्ये प्रेक्षकांना एका भव्य सिनेमॅटिक अनुभवाची खात्री दिली आहे. टीझरची सुरुवात इतिहासापासून होते. यात सांगितले जाते की, मसाल्यांचा व्यापार करण्यासाठी इंग्रज भारतात आले, पण पुढची २५० वर्षे ते येथे टिकून राहण्याचे खरे कारण एक वनस्पती होती. 'ओपियम' म्हणजेच अफू. जगातील हे सर्वात धोकादायक व्यसन प्रामुख्याने दोन ठिकाणी पिकवले जायचे. अफगाणिस्तान आणि गोल्डन ट्रँगल. इंग्रजांनी या भागांवर ताबा मिळवून अफूच्या ९५% धंद्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. १९४७ मध्ये जेव्हा इंग्रज भारत सोडून गेले, तेव्हा ते हा सर्वात फायदेशीर व्यवसाय मागे सोडून गेले. त्यानंतर या धंद्याचे दोन भाग झाले. 'अफगाण ट्रेडिंग कंपनी' आणि 'गोल्डन ट्रेडिंग कंपनी'. येथूनच सुरू झाली अफूवर वर्चस्व मिळवण्याची लढाई आणि क्रूर खलनायक यामुळे जन्माला आहे. टीझरमधील कथा थेट १९६७ मध्ये पोहोचते, जिथे अफगाण कंपनीचा मालक 'दादा सरकार' आणि त्याच्या साम्राज्यातील सुजॉय सरकार, बॉबी सरकार आणि राव यांची झलक दिसते. त्यानंतर जगातील वेगवेगळ्या देशांचे ड्रग्ज ट्रेडर्स दिसतात आणि शेवटी एन्ट्री होते एका 'राक्षसाची'- म्हणजेच ज्युनियर एनटीआरची. या चित्रपटात ज्युनियर एनटीआरने 'लूगर' नावाच्या पात्राची भूमिका साकारली आहे, जो अफगाण ट्रेडिंग कंपनीचा एक धोकादायक हत्यारा आहे. टीझरमध्ये त्याचा एक अंगावर काटा आणणारा संवाद ऐकायला मिळतो. देवाची माझ्यावर एकच कृपा आहे, एकदा ट्रिगर दाबला की मला कधीही पश्चाताप होत नाही. झोपताना स्वप्नात मला त्यांचे चेहरे दिसत नाहीत ज्यांना मी मारले आहे, याशिवाय जे अजून जिवंत वाचले आहेत त्यांचेही चेहरे स्वप्नात येतात. त्यामुळे चुकूनही कोणी माझ्या स्वप्नात येऊ नका. टीझरचा शेवटचा भाग अत्यंत रंजक आहे, जिथे बॉलिवूड अभिनेते अनिल कपूर यांची दमदार एन्ट्री होते. त्यांनी यामध्ये एनसीबीचे प्रमुख 'रघुवीर राठोड' यांची भूमिका साकारली आहे. अशाप्रकारे यानिमित्ताने अनिल कपूर साऊथ इंडस्ट्रीत पदार्पण करत आहेत. या भव्य चित्रपटात ज्युनियर एनटीआर आणि अनिल कपूर यांच्यासोबत बिजू मेनन, रुक्मिणी वसंत, खुशबू सुंदर, गुरु सोमसुंदरम, राजीव कनकला, आशुतोष राणा, अंशुमन पुष्कर, सिद्धांत गुप्ता, प्रभास श्रीनू, शत्रू, शिवा, भीमल जीत ओबेरॉय हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.





# साई पल्लवीने डॉक्टरकी सोडून अभिनयात केली एन्ट्री

साई पल्लवी दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रिय कलाकार आहे. तिने आतापर्यंत अनेक चित्रपट केले आहेत. तसेच ते प्रेक्षकांना भावले सुद्धा आहेत. आणि तिचे एक वेगळेपण आहे. ती एवढी मोठी हीरोइन असूनही नेहमी मेकअप करण्याचे टाळते आणि छोटे कपडे सहसा घालत नाही. तर ती आत्ताच एका चित्रपटामुळे चर्चा झाली होती तो म्हणजे एक दिन. आणि तिचा आगामी चित्रपट म्हणजे रामायण. ४००० कोटींच्या 'रामायण' चित्रपटात दिसलेली साई, नैसर्गिकरित्या सुंदर आहे आणि कोणत्याही शस्त्रक्रियेशिवायही ती अप्रतिम दिसते. सीताची भूमिका केली आहे. साई पल्लवी एक बहुगुणी अभिनेत्री आहे. तिची कारकीर्द याचा पुरावा आहे. तिने वैद्यकशास्त्राचे शिक्षण घेतले आणि जॉर्जियामधून एमबीबीएस पूर्ण करून ती डॉक्टर बनली. नंतर, एका डान्स रिलिटी शोमधून प्रसिद्धी मिळवल्यानंतर, तिने अभिनयाला आपले करिअर म्हणून निवडले. तिला 'प्रेमम' या मल्याळम चित्रपटातून यश मिळाले. तसेच ती एक उत्तम नृत्यांगना देखील आहे. 'फिदा' आणि 'लव्ह स्टोरी' सारख्या चित्रपटांमधील तिच्या नृत्य सादरीकरणाचे खूप कौतुक झाले. साई पल्लवी हिने 'एक दिन' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे. साई पल्लवी आता प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' या चित्रपटात काम करण्यास सज्ज झाली आहे. हा एक भव्य चित्रपट आहे. तर या चित्रपटाची आणि साई पल्लवी हिच्या एका छलकची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत.



# 'राजा शिवाजी'साठी कलाकारांनी घेतलं इतकं मानधन?

'राजा शिवाजी' हा ऐतिहासिक सिनेमा संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी रेकॉर्डब्रेक कमाई केल्याचं पाहायला मिळालं. चार दिवसांत या सिनेमाने ४० कोटींहून अधिक कमाई केली. मराठीसह हिंदी भाषेतही हा सिनेमा प्रदर्शित झाला आहे. याशिवाय या चित्रपटात दमदार कलाकारांची मांदियाळी आहे. 'राजा शिवाजी' सिनेमात अभिषेक बच्चन, विद्या बालन, फरदीन खान, संजय दत्त, भाग्यश्री, महेश मांजरेकर, जितेंद्र जोशी अशा दिग्गज कलाकारांनी काम केलेलं आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्यावर या सगळ्या कलाकारांच्या मानधनाची आणि सिनेमाच्या बजेटची सोशल मीडियावर चर्चा रंगली होती. मात्र, या सगळ्या चर्चांना रितेशने पूर्णविराम दिला आहे. रितेश म्हणाला, अभिषेक बच्चन यांनी या सिनेमात मोफत काम केलेलं आहे. सलमान खान, विद्या बालन, बोमन इराणीइतकंच नव्हे तर रितेश आणि जिनिलीया यांनी देखील या चित्रपटात मोफत काम केलं आहे. जेव्हा महाराजांचा विषय येतो तेव्हा मानधन वगैरे या सगळ्या गोष्टी बाजूला ठेवून आम्ही हा चित्रपट साकारला आहे. तरी ज्या काही कलाकारांच्या बजेटच्या चर्चा सुरू आहेत, त्या चुकीच्या आहेत. कृपया असे काही तर्क लावू नका. आपआपल्या परीने प्रत्येकाने या सिनेमासाठी मनापासून काम केलं आहे. फरदीन खान यांनी देखील चित्रपटात मोफत काम केलं आहे. महाराजांचं नाव ऐकूनच या सगळ्यांनी मोफत काम केलेलं आहे. महाराजांवर आधारित जेवढे सिनेमे येतील तेवढं चांगलंच आहे. कारण, यामुळे आपला गौरवशाली इतिहास तेवढाच आजच्या पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. लहान मुलांनाही आपले महाराज, त्यांचा इतिहास समजला पाहिजे. त्यामुळे, आई-वडिलांनी सुद्धा आपल्या मुलांना घेऊन 'राजा शिवाजी' सिनेमा पाहायला जावं अशी माझी मनापासून इच्छा आहे. सध्या सुट्ट्या सुद्धा सुरू आहेत. त्यामुळे एक चांगला योग जुळून आला आहे. तर, सिनेमा नक्की बघा असं आवाहन रितेशने सर्व प्रेक्षकांना केलं आहे.

# नॅशनल क्रश गिरिजाने लूक बदलला!



आपल्या सहज सुंदर अभिनयाने लाखो प्रेक्षकांची मनं जिंकून घेणारी प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री म्हणून गिरिजा ओकला ओळखलं जातं. गेल्या काही महिन्यांपासून गिरिजा 'नॅशनल क्रश' म्हणून नावारुपाला आली आहे. तिचे निळ्या साडीतले फोटो सर्वत्र तुफान व्हायरल झाले होते; यानंतर सर्वजण तिला 'न्यू नॅशनल क्रश' म्हणू लागले. आजवर गिरिजाने अनेक मालिका आणि मराठीसह हिंदी चित्रपटांमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. सोशल मीडियावर सुद्धा ती नेहमीच सक्रिय असते. गिरिजाने नुकत्याच शेअर केलेल्या एका व्हिडीओने सध्या सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. गिरिजाचा बदललेला आणि नवीन लूक या व्हिडीओमध्ये पाहायला मिळतोय. आता अभिनेत्रीने तिच्या हेअरस्टाइलमध्ये बदल केला आहे. Crtain bangr हेअरकटमध्ये गिरिजा खूपच गोड दिसतेय. गिरिजाचा हा हटके लूक पाहून चाहत्यांनी व्हिडीओवर कमेंट्सचा वर्षाव केला आहे. वॉव न्यू लूक, मिलियन डॉलर स्माइल, प्रिटी गर्ल, किती सुंदर दिसतेस, खूप सुंदर हेअरस्टाइल आहे, आमची हिरोईन, आमची लाडकी गिरिजा, एकीचीच हवा फक्त गिरिजा, खूप सुंदर लूक, गिरिजा वॉव छान दिसतेय अशा असंख्य प्रतिक्रिया गिरिजाच्या व्हिडीओवर चाहत्यांनी दिल्या आहेत. कंगना रणौतने नुकतीच तिच्या आगामी चित्रपटाची घोषणा केली आहे. या सिनेमाचं नाव आहे 'भारत भाग्य विधाता'. या सिनेमात गिरिजा ओक सुद्धा महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे. या सिनेमाचं पोस्टर शेअर करत कंगनाने ही आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. या चित्रपटात कंगना रणौत मुख्य भूमिकेत दिसणार आहे. याची निर्मिती मणिकर्णिका फिल्म्सच्या बॅनरखाली करण्यात आली आहे. हा चित्रपट १२ जूनला प्रदर्शित होणार आहे. या सिनेमात गिरिजाबरोबर हास्यजत्रा फेम लोकप्रिय मराठी अभिनेत्री ईशा डे सुद्धा झळकणार आहे. 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन मनोज तापारिया यांनी केलं आहे. आता गिरिजा यामध्ये कोणती भूमिका साकारणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# मिलिंद गुणाजींचा अभिनय क्षेत्राला रामराम?

मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही आपल्या नाणं खणखणीत वाजवणारे अभिनेते म्हणजे मिलिंद गुणाजी. 'देवदास','फरेब','विरासत' अशा कितीतरी बॉलिवूड सिनेमांमध्ये कधी नायक तर कधी खलनायक होत त्यांनी लोकप्रियता मिळवली. त्यामुळेच आज दिग्गज अभिनेत्यांच्या यादीत त्यांचं नाव आवर्जून घेतलं जातं. जवळपास ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये त्यांनी अभिनय केला असून त्यांनी काही पुस्तकांचं लेखनही केलं आहे. 'भुलभूलैय्या २' या चित्रपटात ते शेवटचे दिसले. त्याशिवाय सोशल मीडियावरही सध्या फारसे सक्रिय नाहीत. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत स्वत: मिलिंद गुणाजी यांनी यामागचं कारण सांगितलं आहे.

मिलिंद गुणाजी यांनी अलिकडेच 'मित्र म्हणे' ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्याना एक प्रश्न विचारला गेला. गेल्या काही वर्षात मिलिंद गुणाजी कुठेच दिसत नाहीत. सोशल मीडियावर देखील सक्रिय नाही. त्यामुळे मिलिंद गुणाजी कुठे गायब झाले? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. मुलाखतीत त्यांना यामागचं कारणही विचारण्यात आलं. त्यावर उत्तर देत ते म्हणाले, मी इकडेच आहे. पण, मध्यंतरी काही काळ माझा आवाज बंद झाला होता. अती बोलण्याचा ज्यांचा व्यवसाय असतो म्हणजे कलाकार, गायक तसेच शिक्षक त्यांना ही समस्या बऱ्याचदा जाणवते. म्हणजे याचा तुमच्या आवाजावर परिणाम होतो. त्यामुळे तुमच्या आवाजाची क्वालिटी एकदम खराब होतो. मग पुढे त्यांनी सांगितलं, काही लोक या परिस्थितीला स्विकारतात आणि मी देखील तसंच केलं होतं. पण, मला असं जाणवलं की माझा आवाज साथ देत नाही. बराच काळ मी या समस्येचा सामना करत होतो. शेवटी देवाच्या कृपेने हा प्रोब्लेम नेमका काय आहे हे समजलं. आता माझा आवाज पूर्णपणे ठीक आहे. कोविड जेव्हा झाला तेव्हा त्या सुमारास हे सगळं झालं. हे नेमकं कशामुळे झालं मला याबद्दल माहित नाही.पण, अती व्होकल कॉड्सचा वापर यामुळे असं होऊ शकतं, असं माझ्या डॉक्टरांनी मला सांगितलं. कोविडचा काळ ते अगदी आतापर्यंत ती समस्या होती. त्यामुळे पडद्यावर येण्यासाठी मी कम्फर्टेबल नव्हतो. एरवी सुद्धा मी कुठल्या पार्ट्या वगैरेला जात नाही कारण मला फारसं जायला आवडत नाही. पण, जेव्हा कधी अशा कुठल्या पार्ट्या किंवा घरगुती कार्यक्रमांना गेल्यावर सुद्धा मला असं जाणवायला लागलं की मी बोलायला लागलो की माझा आवाजच बाहेर यायचा नाही. त्यामुळे तुम्ही असं कोशात जाता. तसंच काहीसं माझ्यासोबत घडलं होतं. असा खुलासा त्यांनी केला. मिलिंद गुणाजींच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर लवकरच ते 'श्री बाबा नीब करोरी महाराज' सिनेमाच्या माध्यमातून ते प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# भारतीय सिनेसृष्टीतील राष्ट्रीय कवि प्रदीप



१९५८ 'हम लाये है तुफानसे कश्ती निकालके इस देशको रखना मेरे बच्चो संभालके' कवी प्रदीप लिखित हे गीत त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतः लाल किल्ल्यावर गायले होते. १९५४ साली 'जागृती' सिनेमात मोहम्मद रफींच्या स्वरात ते चित्रित झाले. 'आवो बच्चो तुम्हे दिखाए झाकी हिंदुस्थान की...' याच चित्रपटातील प्रदीप यांच्या या गीतातील शब्दांच्या जादूने तरुणाईला देशप्रेमाची जागृती दिली. कवी प्रदीप यांनी अनेक गाणी विविध चित्रपटांसाठी लिहिलीत. त्यापैकी ३६ गीतांना स्वतःच्याच गगनभेदी सुरात वाचा फोडली. आस्तिकाच्या नजरेतून मानवाच्या पतनावर हृदयस्पर्शी भाष्य केले. त्यांची काही लोकप्रिय गाणी... 'पिंजरे के पंछी रे । तेरा दर्द न जाने कोई' 'नागमणी' सिनेमात बंदिस्त जीवनाचा दुःखभरा कोंडमारा व मूक वेदना, बुलंद स्वरात प्रकट केल्या. 'तेरे द्वार खडा भगवान...'

'वामन अवतार' मध्ये भगवंताची भिक्षेची याचना प्रदीप यांनी याचक रूपात सादर केली. 'कोई लाख करे चतुराई...' 'चंडिपूजा'मध्ये कर्माचा सिद्धांत आर्त व सार्थ स्वरात गुंफला व गायला. 'देख तेरे संसार की हालत...' बोलपटाच्या सुरुवातीच्या काळातील नाट्यमय स्वरूपाला अव्हेरून ते नैसर्गिक वाटावे अशा सुटसुटीत व शुद्ध हिंदीत गीते लिहून एक चांगले योगदान प्रदीप यांनी दिले. 'चना जोर गरम बाबू मै लाया मजेदार' १९४० सालच्या 'बंधन' चित्रपटातील कवी प्रदीप यांनी लिहिलेले हे हलके फुलके गाणे देशभर खूप प्रसिद्धी पावले. सर्व चनेवाल्यांचे ते आजतागायत विक्री गीत बनले व उत्पादनालाही 'चना जोर गरम' हे नाव मिळाले. यांसारखी गाणी नंतर दोन-तीन चित्रपटातही आली. 'मै क्यू ना नाचू आज कहोजी...' सी. रामचंद्रबरोबर विन्टेज युगाचे साक्षीदार असलेले प्रदीप यांनी १९५९ च्या 'पैगाम' चित्रपटातील गाणी लिहून केवळ धार्मिक, ऐतिहासिक व देशभक्तीपर गीतांचे गीतकार असण्याचा ठप्पा पुसून टाकला. 'कहती है झुकी झुकी नजर दी है धडकते दिल ने खबर...' १९६१ सालच्या 'जिंदगी और ख्वाब' चित्रपटात प्रदीप यांच्या सुमन कल्याणपूर यांनी गायलेल्या मधुर गीतात मीनाकुमारी आनंदहोत्सात होऊन सांज शृंगार करून प्रियकराच्या आगमनाची प्रतीक्षा करतात. 'उपर गगन विशाल नीचे गहरा पाताल' १९५० च्या 'मशाल' चित्रपटात प्रदीप यांचे शब्द व मन्ना डे यांच्या रोचक व गहेर्या स्वरांनी परमेश्वराने साकारलेल्या अद्भुत रचनेचे सार्थ वर्णन करून चित्रपट गीतांचा स्तर निश्चितच उंचावला. 'यतीम है ये अनाथ बालक हे जगवाले दया करो...' अनाथ बालकांवरील कणव १९७७ च्या 'आंख का तारा' चित्रपटातील या गाण्यात लिहून कवीने दर्शकांची हृदये पिळवटून टाकली. हा त्यांचा अखेरचा चित्रपट असावा. सिनेमाव्यतिरिक्त त्यांचे कार्य म्हणजे, १९६२ च्या भारत- चीन युद्धानंतर समर संगीताच्या कार्यक्रमातील गीते. पहिल्या मुंबईतील कार्यक्रमातील त्यांचे गीत खूप लोकप्रिय झाले होते. 'वाह रे चौ एन लायी तुझको शरम ना आयीभूल गया क्या अपना वादा हिंदी चीनी भाई भाई' समर संगीताच्या दिल्ली येथील पंतप्रधान पं. नेहरूंसमोर झालेल्या कार्यक्रमातील त्यांनी रचलेल्या गीताने सी. रामचंद्र यांच्या संगीताने व लता मंगेशकरांच्या स्वराने इतिहास रचला. एक अमर समर गीत जन्माला आले. ते गीत होते... 'ऐ मेरे वतन के लोगो' कविराज प्रदीप यांना राष्ट्रीय कवीचा बहुमान मिळाला. १९६५ सालच्या पाकिस्तान युद्ध जिंकल्यावर असाच कार्यक्रम पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी प्रदीप यांचे गीत आशाताईने गायले. 'करलो प्रणाम ऐ लोगो वो वंदनीय है बहने इस देशके लिये जिन्होने विधवा के कपडे पहने' युद्धात कामी आलेल्या वीर जवानांच्या विधवा पत्नीच्या सांत्वनासाठी हे गीत प्रदीप यांनी लिहिले. ६ फेब्रुवारी १९१५ रोजी मध्य प्रदेशातील बडनागर येथे रामचंद्र नारायण द्विवेदी यांचा जन्म झाला. तो पारतंत्र्याचा काळ होता. देशभक्तीने ओथंबलेले पंडितजी लखनौला जाऊन क्रांतिकारी चळवळीत सामील झाले. १९३९ साली बॉम्बे टॉकीजचे सर्वेसर्वा हिमांशू रॉय यांनी अशाच गाण्यांसाठी सिनेमात बोलाविले व प्रदीप यांनी त्यांचा उद्देश अनेक गाण्यातून सफल केला. त्यांना कवी प्रदीप हे नाव हिमांशू रॉय यांनीच दिले. प्रदीप यांनी ८० हून जास्त चित्रपटात १७०० हून अधिक सर्व प्रकारची गाणी लिहिलीत; परंतु त्यांची खरी ओळख धार्मिक, ऐतिहासिक व देशभक्तीपर गीतांचे गीतकार म्हणूनच झाली.

१९६१ साली संगीत नाटक अक्ॅडमी अवॉर्ड मिळाला. चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च बहुमानाचा 'दादासाहेब फाळके' पुरस्काराने १९९७ साली ते गौरांकित झाले. देशभक्तीचे प्रबोधन, प्रेरणादायी भक्ती व तत्कालीन परिस्थितीवर भाष्य करणारे व आपल्या दमदार आवाजात प्रसृत करणारे कवी प्रदीप यांच्या जीवनाची माला ११ डिसेंबर १९९८ रोजी अखेर तुटली.

**रमेश पोफळी**

**१९४० साली 'बंधन' चित्रपटातील या गाण्याने कवी प्रदीप यांनी युवा पिढीत राष्ट्रभक्तीची चेतना व स्वातंत्र्य ऊर्मी प्रज्वलित केली. हे गाणे देशभर प्रभातफेरीत गायले जाऊ लागले. महात्मा गांधी यांचे स्वीय सचिव पं. महादेवशास्त्री देसाई यांनी या गाण्याला उपनिषदाची उपमा दिली होती. 'आज हिमालय की चोटीने दुष्मन को ललकारा है दूर हटो, दूर हटो ये दुनियावालो हिंदुस्थान हमारा है' १९४३ सालच्या 'किस्मत' चित्रपटातील या गाण्याने देशभर वाद निर्माण झाला होता. हे गाणे सेन्सॉरच्या कात्रीत सापडले ते 'इस धरतीपर कदम बढाना अत्याचार तुम्हारा है...' या ओळीतील शब्दांमुळे. शीघ्रकवी प्रदीप यांनी चौथ्या कडव्यात कुशलतेने बदल केला. 'शुरु हुवा है जंग तुम्हारा जाग उठो हिंदुस्थानी तुम ना किसीके आगे झुकना, जर्मन हो या जापानी' शत्रूच्या यादीतील जर्मन व जपानीच्या उल्लेखामुळे ब्रिटिश सरकारला हे गीत समर्थनार्थ वाटले. सेन्सॉर उठले. बंधुभाव व एकतेचा संदेश देणारी प्रदीप यांची गीते रसिकांना विशिष्ट संस्कारात बांधून त्यातील भाव स्वतःच्याच बुलंद प्रासादिक स्वरातून व्यक्त करायचे.**

# 'घबाडकुंड'मध्ये देवदत्तचा दमदार लूक

'एकापेक्षा ए हिंदी आणि तेलुगू सिनेविश्वात आपल्या अभिनयाची छाप उमटवल्यानंतर अभिनेता देवदत्त नागे आता पुन्हा एकदा मराठी सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आतापर्यंत प्रत्येक चित्रपटात वेगवेगळ्या लूकमध्ये प्रेक्षकांसमोर आलेला देवदत्त नागे पुन्हा एकदा नव्या आणि दमदार अवतारात दिसणार आहे. आपल्या भूमिकांमध्ये नेहमीच वैविध्य जपणार्या देवदत्त नागे याचा 'घबाडकुंड' या आगामी चित्रपटातील लूक विशेष चर्चेचा विषय ठरत आहे. 'घबाडकुंड' या आगामी चित्रपटामधील 'खंग्री'



या त्याच्या भूमिकेचा लूक समोर आला आहे. तीक्ष्ण नजर आणि दमदार स्क्रीन प्रेझेन्स यामुळे त्याच्या या व्यक्तिरेखेभोवती रहस्यमय आकर्षण निर्माण झालं आहे. या चित्रपटासाठी अभिनेत्याने स्वतः च्या व्यक्तिमत्त्वात केलेला बदल, त्यासाठी घेतलेली मेहनत यातून त्याचा हा लूक अधिक प्रभावी ठरणार असल्याचं दिसत आहे. काहीतरी वेगळं सादर करण्याची देवदत्त नागे याची खासियत या नव्या अवतारा-तूनही ठळकपणे दिसून येत आहे. प्रेक्षकांमध्ये आधीपासूनच या चित्रपटाबद्दल उत्सुकता असून, देवदत्त नागेच्या या दमदार लूकमुळे चित्रपटाची उत्सुकता आणखी वाढली आहे.

'घबाडकुंड'मधून प्रेक्षकांना एक वेगळाच थरार अनुभवायला मिळणार आहे. कल्पनेच्या पलीकडचं 'युनिव्हर्स' मोठ्या पडद्यावर साकारण्याचा धाडसी प्रयत्न दिग्दर्शक प्रितम एस. के. पाटील यांनी केला आहे. निर्माते डॉ. रसिक कदम यांची भक्कम साथ या चित्रपटासाठी लाभली आहे. 'आयकॉन दी स्टाईल' या निर्मितीसंस्थे अंतर्गत साकारलेला मराठीतील पहिला सिनेमॅटिक युनिव्हर्स 'घबाडकुंड' येत्या १९ जूनला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.



# वीर पहारिया बेनाम सिनेमात



'स्काय फोर्स'नंतर अभिनेत्याच्या हाती लागला मोठा प्रोजेक्ट, साकारणार महत्त्वपूर्ण भूमिका... महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यांचा नातू म्हणजेच अभिनेता वीर पहारिया मागील अनेक महिन्यांपासून त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे प्रचंड चर्चेत होता. वीर पहारियाने'स्काय फोर्स' मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. या चित्रपटात त्याने अक्षय कुमारसोबत स्क्रिन शेअर केली होती. 'स्काय फोर्स' या देशभक्तीपर चित्रपटात त्याने केलेल्या कामाचं सगळीकडे कौतुक झालं. त्यानंतर आता वीर पहारिया लवकरच नव्या सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे. 'बेनाम' असं त्याच्या या आगामी सिनेमाचं नाव आहे. या ॲक्शन-थ्रिलर चित्रपटात वीर मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

'बेनाम' हा एक ॲक्शनपट आहे. ज्यामध्ये वीर पहारियाचा कधीही न पाहिलेला अंदाज दिसणार आहे. त्यामुळे ही भूमिका त्याच्या करिअरसाठी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. येत्या काही दिवसांत निर्माते अधिकृत घोषणा करण्याच्या तयारीत आहे. त्या त्याच्या या चित्रपटाबद्दल चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, या भूमिकेसाठी वीरने प्रचंड मेहनत घेतल्याचं सांगण्यात येतंय. तसेच चित्रपटात वीरसह आणखी कोणते कलाकार झळकणार याबाबत अद्याप फारशी माहिती समोर आलेली नाही. मात्र, या प्रोजेक्टची सिनेवर्तुळात चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे प्रसिद्ध दिग्दर्शक महेश भट्ट या प्रोजेक्टसोबत जोडले गेले आहेत. त्यामुळे या सिनेमात काहीतरी नक्कीच वेगळं काहीतरी अनुभवायला मिळणार, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. वीर पहारियाने 'स्काय फोर्स' या चित्रपटातून कारकिर्दीची सुरुवात केली. अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी त्यांनी वरुण धवनच्या 'भेडिया' या चित्रपटात सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केलं होतं.

# लग्न करावेसे वाटते, पण...

कलाकार जितके त्यांच्या अभिनयामुळे चर्चेत येतात तितकेच ते त्यांच्या खासगी आयुष्यामुळेदेखील चर्चेत असतात. 'वेलकम' सिनेमात दिसलेली मराठमोळी अभिनेत्री सुप्रिया कर्णिक अनेक वर्षांपासून सिनेसृष्टीत काम करत आहे. अभिनेत्री तिच्या कामासाठी जितकी ओळखली जाते, तितकीच ती तिच्या खासगी आयुष्यामुळेदेखील चर्चेत असते. सुप्रिया ५१ वर्षांची आहे. मात्र, तिने अद्याप लग्न केलेले नाही. एका मुलाखतीत अभिनेत्रीने लग्न न करण्याबद्दल वक्तव्य केले. अविवाहित राहण्याचा निर्णय तिने का घेतला, याबद्दल अभिनेत्रीने खुलासा केला आहे. सुप्रिया म्हणाली की, आपण जसे ठरवतो तशाच पद्धतीने गोष्टी होतील याची शाश्वती नाही. तसेच, आपण ठरवल्याप्रमाणेच गोष्टी व्हाव्यात हेही गरजेचे नाही. लग्न न करण्याचे कारण सांगत ती म्हणाली, त्याचे काही असे ठराविक कारण नाही. मी कधी योग्य किंवा अयोग्य व्यक्तीच्या शोधात असत नाही, कारण योग्य किंवा अयोग्य व्यक्तीची काही व्याख्या नाही. एकतर तुमचे लग्न होत नाही किंवा तुम्हाला लग्न करायचे नसते. कधी कधी तुम्हाला लग्न करावेसे वाटते, पण ते होऊ शकत नाही; ही काही फार मोठी गोष्ट नाही. सुप्रिया पुढे म्हणाली, मी जेव्हा २५-२६ वर्षांची होते तेव्हा मला लग्न करायचे होते, मात्र आता मला तसे वाटत नाही. मला कोणी बॉयफ्रेंड नाही किंवा मला कोणी भेटले नाही म्हणून मी उदास आहे असेही नाही, सुप्रियाचे अनेकदा मन दुखावले गेले आहे, अशा अनेकदा चर्चा झाल्या. यावर अभिनेत्री म्हणाली, रोमँटिक नात्यातच मन दुखावले जाते असे नाही. आजही अनेकदा माझे मन दुखावते. पण, माझ्या जोडीदारामुळेच मला वाईट वाटते किंवा दुःख होते असे नाही. बहीण, भाऊ, मित्र यांच्यामुळेदेखील मला वाईट वाटू शकते. माझ्या मनात सर्वांविषयी प्रेम आहे, पण त्यांनी जे माझ्याबरोबर केले ते मी विसरू शकत नाही. पुढे तिला विचारले की, प्रेमात कधी धोका मिळाला आहे का? यावर ती म्हणाली, असे झाले असते तर त्या व्यक्तीला मी जमिनीत पुरले असते. मला कोणाची तरी साथ हवी आहे, म्हणून मी रिलेशनशिपमध्ये जात नाही. कुटुंबीय, मित्र हेदेखील तुम्हाला साथ देऊ शकतात, असे म्हणत अभिनेत्रीने भावना व्यक्त केल्या. अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी तिने मॉडेल, फ्लाइट अटेंडंट म्हणूनही काम केले आहे. १९९२ मध्ये तिने अभिनय क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली होती.



# नवाजुद्दीनचा रिटायरमेंट प्लॅन तयार

बॉलिवूडमधील सर्वात प्रतिभावान अभिनेत्यांपैकी एक असलेला नवाजुद्दीन सिद्दीकीने छोट्या-छोट्या भूमिकांपासून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करून आज चित्रपटसृष्टीत एक मोठे स्थान निर्माण केले आहे. १९९९ मध्ये आलेल्या आमिर खानच्या 'सरफरोश' चित्रपटात एका गुन्हेगाराची अगदी छोटी भूमिका त्याने साकारली होती. अशातच नवाजुद्दीनने रिटायरमेंटबद्दल जे विधान केलंय जे चर्चेत आहे. नवाजुद्दीन सिद्दीकी आता ५२ वर्षांचे झाला आहे. या निमित्ताने, निवृत्तीबद्दल नवाजचे काय विचार आहेत, यावर एका मुलाखतीत त्याने मनातील भावना व्यक्त केल्या आहेत. एका मुलाखतीत नवाजुद्दीनला विचारण्यात आले होते की, जर भविष्यात लोकांनी त्याला काम देणे बंद केले तर तो काय करेल? यावर नवाजने उत्तर दिले की, मी स्वतःचे चित्रपट बनवायला सुरुवात करेन. मला या गोष्टीची अजिबात असुरक्षितता वाटत नाही. उलट मला आता कामाचा असा कोणताही मोह राहिलेला नाही.

नवाजुद्दीन पुढे म्हणाला, जर मला काम मिळणे बंद झाले, तर मी नवीन दिग्दर्शकांची एक फौज उभी करेन. मी त्यांच्यासोबत काम करेन आणि तेही एकही रुपया न घेता. जेवणाची चिंता मला अजिबात नाही. संघर्षाच्या काळात जेव्हा मला भूक लागायची, तेव्हा जेवण मिळत नव्हते; पण आता माझा जेवणावरूनच मोह उडाला आहे. माझ्याकडे असे दोन-चार दिग्दर्शक मित्र आहेत, ज्यांच्यासाठी मी मोफत काम करेन. दोन महिने तरी शूटिंग चालेल आणि ते दोन महिने ते मला जेवायला घालतील. एका ठराविक वयानंतर कलाकारांना निवृत्ती घ्यावी लागते, अशा वेळी सर्व काही सोडून पुन्हा गावी जाण्याचा विचार मनात येतो का? या प्रश्नावर उत्तर देताना नवाजुद्दीन म्हणाला, असे होऊ शकते की मी गावी परत जाईन, पण निवृत्तीनंतर काय होईल याचा मी कधी विचार करत नाही. अभिनेता असल्याचा एक फायदा असा असतो की तो म्हातारपणापर्यंत काम करू शकतो. अडचण फक्त स्टार्सची होते. जोपर्यंत ते दिसायला चांगले आहेत, तोपर्यंतच ते स्टार राहतात, अभिनेत्याच्या बाबतीत तसे नसते. नवाजुद्दीनचा नुकताच रिलीज झालेला 'मैं ॲक्टर नही हूं' हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस पडला आहे.



# बॉबीचा कूल अंदाज चर्चेत!

ॲनिमल या चित्रपटातील एका वेगळ्या भूमिकेनंतर अभिनेता बॉबी देओलच्या करिअरला बुस्ट मिळाला. या चित्रपटाच्या अभूतपूर्व यशानंतर बॉबीला अनेक चित्रपटांच्या ऑफर्स मिळाल्या. आता पुन्हा बॉबी चर्चेत आला आहे, त्याच्या आगामी चित्रपटामुळे. या चित्रपटाचे नाव बंदर असून गेल्या अनेक दिवसांपासून चित्रपटाविषयी जोरदार चर्चा सुरू आहे. अखेर या चित्रपटाचे दुसरे पोस्टर रिलीज करण्यात आले असून, बॉबी देओलचा लूक रिव्हील करण्यात आला आहे. तसेच चित्रपटाच्या रिलीज डेटचीही घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे बॉबीच्या चाहत्यांना या चित्रपटाविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

बंदरच्या नवीन पोस्टरमध्ये बॉबी कूल अंदाजात दिसत आहे. हातात गिटार समोर माईक आणि वेगळ्या वेशभूषेत असल्यामुळे ९० च्या दशकातील चित्रपटांची आठवण येते. 'बंदर'चा टीझर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाची बॉबीच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. या चित्रपटात बॉबी देओलसह सान्या मल्होत्रा, सपना पब्बी, सबा आझाद, इंद्रजित सुकुमारन, जितेंद्र जोशी, राज बी. शेट्टी आणि नागेश भोसले या कलाकारांच्याही महत्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाचे लेखन सुदीप शर्मा आणि अभिषेक बॅनर्जी यांनी केले असून, दिग्दर्शन अनुराग कश्यप यांनी केले आहे. तर चित्रपटाची निर्मिती निखिल द्विवेदी यांच्या 'सॅफ्रन मॅजिक वर्क्स' या निर्मिती संस्थेअंतर्गत झाली आहे. हा चित्रपट ५ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# दिशाची हॉलिवूडमध्ये एन्ट्री!

बॉलिवूडमधील काही कलाकारांना हॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळते. अशीच एक संधी अभिनेत्री दिशा पटानीला मिळाली आहे. अभिनेत्री दिशा पटानी एका हॉलिवूड चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटाचे नाव 'द पोर्टल ऑफ फोर्स' असून, हा एक ॲक्शन-थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटात हॉलिवूडमधील केविन स्पेसी, टायरेस गिब्सन आणि डॉल्फ लुंडग्रेन यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत. लाडो ओखोटनिकोव्ह यांनी तयार केलेल्या 'स्टॅंटिगार्ड्स व्हर्सेस हॉलिगार्ड्स' या नवीन सिनेमॅटिक युनिव्हर्समधील हा पहिला भाग आहे. या चित्रपटात दिशाने जेसिकाची भूमिका साकारली आहे, जी स्टॅंटिगार्ड्स आणि हॉलिगार्ड्स या दोन प्राचीन गटांमध्ये अडकलेली आहे. दोन गटांमधील दीर्घकाळ चाललेल्या संघर्षाभोवती चित्रपटातील कथा फिरते, ज्यात जेसिकाला 'द चोझन वन' म्हणून चित्रित केलेले आहे. चित्रपटाच्या मूळ कथानकानुसार, जेसिका युद्धाचे तसेच मानवतेचे भवितव्य ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. केविन स्पेसी दिग्दर्शित हा चित्रपट दोन दशकांहून अधिक काळानंतर दिग्दर्शनात त्यांचे पुनरागमन दर्शवतो. दिशा बॉलिवूडमधील एक प्रसिद्ध अभिनेत्री असून, अनेक चित्रपटात ती ॲक्शन करताना दिसली आहे. हॉलिवूड चित्रपटात ती दिसणार असल्याने तिच्या चाहत्यांना उत्सुकता लागलेली आहे. 'द पोर्टल ऑफ फोर्स' चित्रपटाचा ट्रेलर समोर आला असला तरी चित्रपटाची रिलीज डेट जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, ट्रेलरच्या शेवटी कमिंग सुन २०२६ असे लिहिलेले दिसते. त्यामुळे हा चित्रपट याच वर्षी रिलीज होईल अशी शक्यता आहे. दरम्यान, 'द पोर्टल ऑफ फोर्स' हॉलिवूड चित्रपटांची दारं खुली करणार चित्रपट ठरू शकतो. हे तिचे हॉलिवूडमधील पदार्पण समजले जाते. याशिवाय दिशा आगामी चित्रपट अवारापन २ मध्येही दिसणार आहे.



# रागिनी ३ मधून तमन्नाचा पत्ता कट!

प्रसिद्ध निर्माती- दिग्दर्शिका एकता कपूर लवकरच रागिणी ३ घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटामुळे ती बर्याच काळापासून चर्चेत आहे. या चित्रपटाच्या चित्रीकरणाविषयी अनेक अपडेट सतत समोर येत आहेत. अशातच कास्टिंगबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. या चित्रपटात अभिनेत्री तमन्ना भाटियाला कास्ट करण्यात आले होते. आता याबाबत एक महत्वाची माहिती समोर आली आहे. 'रागिणी' फ्रँचायझीच्या तिसर्या भागात अभिनेत्री तमन्ना भाटियाचा पत्ता कट करण्यात आला असून तिच्या जागी अभिनेत्री नर्गिस फाखरी हिला कास्ट करण्यात आल्याचे समजते. मात्र, याबाबत अजून अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

वृत्तानुसार, तमन्ना भाटिया 'रागिणी ३' चित्रपटाचा भाग असणार नाही. निर्मात्यांनी चित्रपटात तमन्ना भाटियाच्या जागी नर्गिस फाखरीला अंतिम केले आहे. त्यामुळे आयुष शर्मा आणि नर्गिस फाखरी ही जोडी पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर रोमान्स करताना दिसणार आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून निर्माते प्रेक्षकांना 'डेट नाईट हॉरर'चा अनुभव देण्याच्या तयारीत आहेत.

चित्रपटाच्या दिग्दर्शनासाठी शशांक घोष यांची निवड करण्यात आली आहे. 'रागिणी ३' चे दिग्दर्शन करण्यापूर्वी शशांक घोष यांनी 'खूबसूरत' (२०१४) आणि 'वीरे दी वेडिंग' (२०१८) या चित्रपटांचे दिग्दर्शक केले आहे. निर्मात्यांची हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित करण्याची योजना आखली आहे. त्यानुसार जुलै २०२६ पासून या चित्रपटाच्या चित्रीकरणावर काम करण्यास सुरूवात केली जाणार असल्याची माहिती मिळत आहे. रागिणी एमएमएस चित्रपटाचा पहिला भाग २०११ मध्ये प्रदर्शित झाला होता. ज्यात राजकुमार राव आणि कायनाज मोतीवाला यांच्या मुख्य भूमिका होत्या. यानंतर २०१४ मध्ये 'रागिणी एमएमएस २' आला, ज्यात सनी लिओनी मुख्य भूमिकेत होती. तिने या चित्रपटात बेबी डॉलवर केलेला डान्स चर्चेचा विषय ठरला होता.

